जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**
**प्रेस नोट दि.२४/१०/२०२४**
**दि.२३/१०/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ४५९/२०२४, भा.न्या.संहिता कलम १०९,११५(२),३५२,३२४(४),३(५)व क्रिमिनल लॉ अमेडमेट कलम ७ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४३ वर्षे रा.गंज पेठ पुणे |
| **आरोपीत** | १) अभय राजु कितुंकर वय ३० वर्ष रा.घोरपडी पेठ पुणे (अटक) व इतर तीन (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/१०/२०२४ रोजी दुपारी १३/४५ वा. सुमारास स्वारगेट एस.टी स्टॅण्ड येथील आऊट गेट चे कडूलिंबाचे झाडाखाली |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व जैनउददीन भाईजान हे रिक्षा चालक असुन वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी यातील जैनउददीन भाईजान वय ४८ वर्षे रा.कोढवा पुणे हा त्याची रिक्षा घेवून स्वारगेट एस.टी.स्टॅण्डचे आऊटगेट जवळील कडूलिंबाचे झाडाखाली थांबलेला असताना यातील नमुद इसम हे जैनउददीन याचे जवळ येवून काल झालेले भांडणाचे कारणावरून त्यास शिवीगाळ करून कंबरेला खवलेले लोखंडी हत्यारे काढून जिवे ठार मारण्याचे उद्देशाने जैनउददीन याचे डोक्यात तसेच हातावर वार करुन तसेच हाताने मारहाण करून गंभीर जखमी करुन त्यास जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला व त्याचे रिक्षाची समोरील काच फोडून लोकामध्ये दहशत निर्माण केली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.रविंद्र कस्पटे,मो.नं.७०३८४९९७१७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे ३१८/२०२४, भा.न्या.संहिता कलम ३०३(२), |
| **फिर्यादी** | एक महिला वय २९ वर्षे,रा.आंबेगाव,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २०/१०/२०२४,रोजी दुपारी १३/३० ते १४/०० वा.चे सुमारास राममंदिरा समोर तुळशीबाग,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांची बहीण व त्यांच्या दोन्ही मुलींसह वर नमुद ठिकाणी खरेदी करीता आल्या होत्या. त्या खरेदी करीत असतांना कोणी तरी अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन फिर्यादी यांचे खांद्यावरील पर्समध्ये ठेवलेली हॅण्डपर्स ज्यामध्ये रोख २२००/-रुपये व सोन्याचे पेंडल व सोन्याची चैन असा एकुण ३७,१३८/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हातचलाखीने,फिर्यादी यांचे संमतीशिवाय स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी लबाडीने चोरून नेला आहे |
| **त.अंमलदार** | पो हवा.साळवे,मो.नं.७२७७३३१७१७ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ५३०/२०२४, भा.न्या.संहिता कलम ३०३(२) |
| **फिर्यादी** | एक इसम,वय ७३ वर्षे,रा.चंदननगर,पुणे |

| | |
|---|---|
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/१०/२०२४ रोजी सकाळी १०/३० वा. ते १०/४५ वा.चे दरम्यान कात्रज ते वाघोली जाणारी पीएमपीएल बस मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणाहुन प्रवास करत असतांना कोणीतरी अज्ञात इसमाने बसमधील गर्दीचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे गळयातील २,५०,०००/- रु किंमतीची सोन्याची चैन फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीच्या इराद्याने चोरुन नेली आहे. पो.उप.निरी.नवनाथ क्षीरसागर मो.नं.७०३८११५३३४ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ६८४/२०२४,भा.दं.वि.कलम ४१९,४२० सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम क.६६ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ५५ वर्षे,रा.येरवडा,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १९/०१/२०२४ ते दि.२०/०२/२०२४ रोजी दरम्यान ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची नमुद मोबाईल धारक इसमांनी शेअर्स ट्रेडींग मध्ये गुंतवणूक करण्याचे बहाण्याने एकूण १९,५०,२००/- रुपयेची आर्थिक फसवणूक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी.रविंद्र शेळके मो.नं.९७६४०००९०१ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे २४८/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ३८ वर्षे,रा.कॅम्प,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/११/२०२३ ते दि.२८/११/२०२३ रोजी पर्यंत ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना टेलिग्राम आयडी धारक व वापरकर्ते,यांनी फिर्यादी यांना टास्कमध्ये पैसे गुंतवणुक करण्याचे सांगुन व त्यांनी सांगितलेल्या व्हिडीओ लाईक करणे हा टास्क देवून त्यातून भरपूर नफा मिळवून देतो असे अमिष दाखवून त्यांचे ट्रान्झेक्शन आयडी चे बेनिफिशिअरी बँक खातेधारक व वापरकर्ते,तसेच आयएमपीएस चे बेनिफिशिअरी बँक खातेधारक व वापरकर्ते यांच्या खात्यामधे फिर्यादी यांचे एचडीएफसी बँक खाते मधून एकूण रक्कम १८,६५,६००/- रूपये भरण्यास भाग पाडून आजपावेतो कोणतीही रक्कम परत न करता फिर्यादी यांची अर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे)प्रदिप पवार मो.नं.८८८८८८५८४५/८६६८३३१८३३ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ६८५/२०२४,भा.न्या.सं.कलम ३१९(२),३१८(४),३(५)सह माहीती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(क) व ६६(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ७२ वर्षे, रा.कल्याणीनगर,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/१०/२०२४ रोजी फिर्यादी यांचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील मोबाईल धारक इसमांनी आपसांत संगणमत करून फिर्यादींची फसवणूक करण्याच्या उद्देशाने त्यांचे आधारकार्ड राहते पत्त्यावर डिलीव्हरी न झालेला इलेक्ट्रॉनिक संदेश जाणीवपुर्वक करून सबब त्यांनी भारतीय डाक विभागाच्या हेल्पलाईनवर मदतीसाठी संपर्क केला असता सदर इसमांनी ते हेल्पलाईनचे अधिकृत तक्रार निवारण प्रतिनिधी असल्याचे भासवून फिर्यादी यांना व्हिडीओ कॉल करून त्यांचेकडील इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापराने फिर्यादींचे वॉलेटशी संलग्न एचडीएफसी बँक खात्यातून ९,८८३१/- रूपये रक्कम लबाडीचे इरादयाने हस्तांतरीत करून फिर्यादी यांचे आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी.रविंद्र शेळके मो.नं.९७६४०००९०१ |

## दि.२४/१०/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दुपारी १२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे २५४/२०२४,भा.न्या.सं.कलम ३०९(४),३३३,३५१(३),आर्म ॲक्ट कलम ४(२५), महा.पो.ॲक्ट कलम ३७(१)सह १३५ |
| **फिर्यादी** | एक इसम वय २३ वर्षे, रा.बिबवेवाडी,पुणे |
| **आरोपीत** | १)प्रदिप मंगेश सोनवणे, वय २१ वर्षे,रा.आंबेडकर नगर,गल्ली नं.५,कोंढवा ब्रु,पुणे २)सुजल विकास वानखेडे, वय २१ वर्षे,रा.गल्ली नं.१,लक्ष्मीनगर,कोंढवा ब्रु,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/१०/२०२४ रोजी २३/४५ वा.ते दि.२४/१०/२०२४ रोजी ०१/३० वा.चे दरम्यान फ्लॅट नं. १०४,विरीना अपार्टमेंट,जागडेनगर,भाग २,बिबवेवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचा मित्र असे फिर्यादी यांचा चुलत भाऊ याचे वरील नमुद फ्लॅट वर असताना यातील नमुद इसम जबरदस्ती फ्लॅट मध्ये येवून स्वप्नील आहे का? असे विचारुन स्वप्नीलला सर्व विषय माहीती आहे असे म्हणून स्वप्नीलकडून मला पैसे येणे आहेत, तो नाहीतर तुम्ही मला चार हजार रुपये द्या,असे म्हणून पैशांची मागणी करुन प्रदिप सोनवणे याने फिर्यादी व त्यांचे मित्रास त्याचेकडील हत्यार दाखवून धमकावून जबरदस्तीने फिर्यादी व त्यांचे मित्राचे खिसे तपासुन फिर्यादी यांचेवर हत्यार उगारुन व जीवे मारणेची धमकी देवून फिर्यादी यांचे खिश्यामधून रोख रुपये ६००/- व फिर्यादीचा मित्र याचे खिश्यातील पाकीटा मधील रोख ४००/- रुपये काढून घेतले. |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी.विद्या सावंत,मो.नं.८६०५०८७१०० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे १००६/२०२४,भा.न्या.सं.कलम ३०५,३३१(४),३३४(१) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३७ वर्षे,रा.वाघोली,पुणे. |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/१०/२०२४ रोजी १८/०० वा.ते दि.२३/१०/२०२४ रोजी सकाळी ०७/०० वा.चे दरम्यान वुई फोर केबल्स प्रा.लि.कंपनी दत्त समृध्दीनगर लोणीकंद,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची कंपनी ही नमुद ठिकाणी बंद असताना नमुद इसमांनी कंपनीचे बंद शटर उचकटुन आत प्रवेश करून कंपनीमधील एकुण १२,००,०००/- रू.किंमतीचे कॉपर वायरचे बंडल व कॉपर बॉबीन असा माल चोरून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.रविंद्र गोडसे,मो.नं.८०८२०७७१०० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**